जा.क्र ५० /२०२४
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
समुद्रपुर, दिनांक:२०-०१-२०२४.

प्रति,

मा.प्राचार्य,
विद्या विकास महाविद्यालय,
समुद्रपूर.

**विषय** :- मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करणेबाबत.

**संदर्भ** :- मा. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे पत्र
क्रमांक २६६/बी-२३-११/६३, भाग-२, दिनांक १५/०१/२०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येत आहे की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भिय पत्र व शासन निर्णयानुसार दिनांक १४ जानेवारी २०२४ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा आयोजित करण्याच्या अनुषंगाने या न्यायालयामध्ये **'मराठी भाषा संरक्षण आणि विकास संस्था'** या विषयावर परिसंवाद आयोजीत करावयाचा आहे.

सदर परिसंवादामध्ये मराठी भाषेचा शासकीय कामकाजामध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये जास्तीत जास्त वापर कसा करता येईल. तसेच मराठी भाषा ही ज्ञानसंवर्धनाची भाषा म्हणून समाजामध्ये तिचा प्रसार आणि प्रचार कसा करता येईल याबाबत परिसंवादामध्ये मार्गदर्शन करावयाचे आहे.

करीता आपल्या महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक श्री... डॉ. मिलिंद कांबळे यांना उपरोक्त परिसंवादाकरीता प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रीत केल्यास या न्यायालयातील सरकारी अभियोक्ता, वकील संघ, कर्मचारी तसेच न्यायालयात येणारे पक्षकार यांना मराठी भाषा विषयांवर योक्य ते मार्गदर्शन मिळेल.

करीता दिनांक २३/०१/२०२४ ते २५/०१/२०२४ पर्यंत कोणत्याही एका दिवशी दुपारी ठिक ०२.३० वाजता संबंधित प्राध्यापकाला प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रीत करण्यास सहमती दयावी. तसे त्यांना सुचित करावे.

(डी.एस पारवाणी)
दिवाणी न्यायालय, क.स्तर,
समुद्रपूर

Vidya Vikas Arts Commerce & Science College
आ.जा.क्र. 06
/2024